**आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्यित "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (MAGNET) प्रकल्प संस्था" स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः योजना १०२० /प्र.क्र. १८३ /२१-स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०९ ऑक्टोबर २०२०

**<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. कृपमं ०११८ /प्र.क्र. १३ /२१-स दि.१९.१०.२०१८ व दि.२०.१०.२०१८**
**२) शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. कृपमं ०११८ /प्र.क्र. १३ /२१-स दि.३०.०९.२०२०**

**<u>प्रस्तावना</u> :-**

आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (Maharashtra Agribusiness Network -MAGNET) राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये ६ वर्षासाठी (सन २०२० ते २०२६ पर्यंत) राबविण्याचा निर्णय दि.२९/०७/२०२० रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यास दि.३०.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (MAGNET) संस्था" स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (Maharashtra Agribusiness Network -MAGNET) राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये ६ वर्षासाठी (सन २०२० ते २०२६ पर्यंत) राबविण्याकरिता संस्था नोंदणी अधिनियम १८६० (XXI of १८६०) अन्वये "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (MAGNET) संस्था" स्थापन करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. मॅग्नेट संस्थेची रचना खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | समिती सदस्याचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पणन विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | कार्यकारी संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई | सदस्य |
| ३ | पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४ | कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे | सदस्य |
| ५ | उपसचिव, पणन विभाग, मंत्रालय मुंबई. | सदस्य |
| ६ | उपसचिव, कृषि विभाग, मंत्रालय मुंबई. | सदस्य |
| ७ | उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई. | सदस्य |
| ८ | उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई. | सदस्य |
| ९ | प्रकल्प संचालक, मॅग्नेट प्रकल्प | सदस्य सचिव |

३. मॅग्नेट संस्थेचे Memorandum of Association आणि Rules and Regulations निश्चित करण्याचे अधिकार प्रधान सचिव (पणन) यांना असतील

**४.** कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांनी महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प(मॅग्नेट) संस्थेची नोंदणी तातडीने करुन घ्यावी तसेच, या संस्थेंतर्गत प्रकल्पाचा समन्वय व व्यवस्थापन कक्ष स्थापन करावा.

५. महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) संस्थेच्या प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षासाठी राष्ट्रीयकृत बँकेत चालू खाते (Current Account) उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर बँक खाते PFMS प्रणालीशी संलग्न करावे व या बँक खात्याशी सर्व प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांची बँक खाती PFMS प्रणालीद्वारे संलग्न करावे तसेच, प्रकल्पांतर्गत वितरीत करण्यात येणारा राज्य हिश्श्याचा व बाह्य हिश्श्याचा निधी या खात्यात जमा करण्यात यावा.

६. प्रकल्पाकरीता उघडण्यात आलेले बँक खाते हे केवळ महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पाकरीताच असेल तसेच प्रकल्पाकरिता प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग प्रकल्प अंमलबजावणीसाठीच करावा. प्रकल्प संपल्यानंतर लेखा परिक्षण कार्यवाही पूर्ण करुन सदर बँक खातेही बंद करणे आवश्यक राहील.

७. महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पाकरीता प्राप्त झालेले अनुदान त्या-त्या वित्तीय वर्षात खर्च करणे बंधनकारक राहील व अपवादात्मक परिस्थितीत राज्य शासनाने मंजूरी दिलेल्या मुदतवाढीप्रमाणे खर्च करता येईल. ज्या प्रकरणी मुदतवाढ दिलेली नाही, अशा प्रकरणी सदर बँक खात्यातील अखर्चित रकमा शासनाकडे समायोजित करणे आवश्यक राहील.

८. सदर बँक खात्यातील व्यवहाराचे मासिक/तिमाही ताळमेळ करणे तसेच लेखापरिक्षण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे, प्रकल्पाच्या वित्तीय पुस्तिकेत नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार सदर बँक खात्याचे अंतर्गत व बाह्य लेखापरिक्षण नियमितपणे करावे.

९. सदर बँक खाते बंद करण्यात आल्यास, त्यामधील शिल्लक रकमेचा ताळमेळ घेऊन शिल्लक अखर्चित रक्कम योग्य त्या शासन लेखाशिर्षाखाली तात्काळ जमा करावी.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२०१०१३१११६४६६२०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KALU GONYA VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, postalCode=400032, street=MANTRALAYA , MUMBAI , serialNumber=8c5d0f275c3d9a21db07fecf7919c2d83796e88930d62d44e7a4a6d4cbee7e0e, ou=CO OPERATION MARKETING AND TEXTILE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KALU GONYA VALVI
Date: 2020.10.13 11:18:31 +05'30'

**(का.गो.वळवी)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान सभा / परिषद, विधान भवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स. मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (पणन/वित्त/नियोजन), मंत्रालय, मुंबई
९. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
११. कार्यकारी संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
१२. उप सचिव, वित्त विभाग (व्यय-२/ अर्थबळ), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१३. उप सचिव, नियोजन विभाग ( का-१४३१), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
१४. उप सचिव, (कृषि), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१५.उप सचिव, (पणन), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१६.महालेखापाल, लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई

१७.महालेखापाल, लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर

१८. सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष, ५वा मजला, नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर,मुंबई ३२.

१९. सर्व जिल्हा कोषागर अधिकारी

२०. निवासी लेखापरिक्षण अधिकारी, मुंबई

२१. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

२२. अवर सचिव/कक्ष अधिकारी (१७-स/रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

२३.निवडनस्ती (२१-स)